महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture

202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र. : मॲप/सर्व संस्था/ॲक्युपंक्चर जनजागृती दिन/ ९१५ २०२६ दिनांक : १३/११/२०२६

प्रति,

१. सर्व प्राचार्य,
मान्यताप्राप्त ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम संस्था.

२. सर्व परिषद मान्यताप्राप्त ॲक्युपंक्चर प्रशिक्षण केंद्रे.

३. सर्व नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यावसायिक,
महाराष्ट्र राज्य.

विषय : दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी -ॲक्युपंक्चर जनजागृती दिन॰ (Acupuncture Awareness Day) साजरा करण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेचे जा.क्र. मॲप/सर्व संस्था/ॲक्युपंक्चर व्यावसायिक/ ॲक्युपंक्चर दिवस/७७०/२०२५, दिनांक १३/११/२०२५ रोजीचे परिपत्रक.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम, २०१५ अन्वये महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेची स्थापना केली आहे. सदर अधिनियमातील तरतुदींनुसार राज्यातील ॲक्युपंक्चर व्यावसायिकांची नोंदणी करण्यात येत असून, परिषदेच्या मान्यतेने राज्यातील विविध संस्थांमध्ये ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.

ॲक्युपंक्चर ही जगातील अनेक देशांमध्ये आरोग्यसेवेच्या क्षेत्रात वापरली जाणारी एक पूरक चिकित्सा पद्धती आहे. या चिकित्सा पद्धतीचे स्वरूप, उपयोग, शास्त्रीय माहिती व महत्त्व याबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी **१६ नोव्हेंबर हा दिवस -ॲक्युपंक्चर जनजागृती दिन॰** (Acupuncture Awareness Day) म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीचा प्रसार व जनजागृती करण्याबरोबरच महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेच्या मान्यतेने सुरू असलेल्या दोन वर्षांच्या ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाची माहिती इयत्ता बारावीतील विद्यार्थी, पालक व इच्छुक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबंधित संस्थांनी व नोंदणीकृत व्यावसायिकांनी खालीलप्रमाणे विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करावे.

१. जनजागृतीपर उपक्रम :

१. ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीचे स्वरूप, तत्त्वे, उपयोग, उपचारपद्धती व विविध आरोग्यविषयक तक्रारींमध्ये तिची उपयुक्तता याबाबत सर्वसामान्य नागरिकांना माहिती द्यावी.

२. मान्यताप्राप्त ॲक्युपंक्चर पदविका अभ्यासक्रम संस्था, परिषद मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्रे व नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यावसायिक यांनी स्थानिक पातळीवर मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती शिबिरे, कार्यशाळा, प्रात्यक्षिके व रुग्ण मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करावेत.

३. शाळा, महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये व्याख्याने व मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करून ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाची माहिती विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहोचवावी.

४. संस्थांमधील विद्यार्थी, प्राध्यापक, तज्ज्ञ व नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यावसायिक यांचा सक्रिय सहभाग घेऊन या क्षेत्रातील शैक्षणिक, संशोधनात्मक व व्यावसायिक विकासाला प्रोत्साहन द्यावे.

५. वृत्तपत्रे, स्थानिक प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया व इतर उपलब्ध माध्यमांचा प्रभावी वापर करून ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीबाबत व्यापक जनजागृती करावी.

६. ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीचे नियमन, परिषदेची भूमिका, व्यावसायिक नोंदणी व या क्षेत्रातील उपलब्ध शैक्षणिक संधी याबाबत नागरिकांना योग्य माहिती देऊन या चिकित्सा पद्धतीबाबत विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

२. कार्यक्रम आयोजन व अहवाल सादर करण्याबाबत :

सर्व संबंधित संस्थांना निर्देशित करण्यात येते की, दिनांक **१६ नोव्हेंबर २०२६ रोजी जागतीक ॲक्युपंक्चर दिन साजरा करावा तसेच दिनांक १६ ते २३ नोव्हेंबर २०२६** या कालावधीत वरीलप्रमाणे जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून -ॲक्युपंक्चर जनजागृती सप्ताह॰ उत्साहात साजरा करावा.

सदर कार्यक्रम आयोजित केल्यानंतर कार्यक्रमाची छायाचित्रे, सहभागींची संख्या, आयोजित उपक्रमांचा तपशील व कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल **दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत** महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई येथे ई-मेलद्वारे अथवा प्रत्यक्ष कार्यालयात सादर करावा.

सर्व संबंधित संस्थांनी व नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यावसायिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीचा प्रसार, प्रचार व जनजागृती करण्यासाठी सहकार्य करावे.

सदर परिपत्रकाची नोंद घेऊन त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

(नारायण डी. नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई